विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता "विशेष निधी" उपलब्ध करण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग,

शासन निर्णय क्रमांक- विमंका २०१८/प्र.क्र.३३/का. १४१६,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक: २३ जुलै, २०१९

वाचा:

१. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का. १४१८, दिनांक १९ जुलै, २०११
२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. माविका-२०१२/प्र.क्र.६९/का. १४१८, दिनांक १२ जुलै, २०१२
३. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. माविका-२०१३/प्र.क्र.४/का. १४१८, दिनांक २४ जुलै, २०१३
४. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. विमंवि-२०१४/प्र.क्र.१२२/का. १४१६, दिनांक ०४ ऑगस्ट, २०१४
५. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. माविका-२०१७/प्र.क्र.१२२/का. १४१८, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना:

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) नुसार महाराष्ट्राचे राज्यपाल महोदयांनी "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, १९९४" पारित करून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळे स्थापन केलेली आहेत. मा. राज्यपाल महोदयांनी "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, २०११" पारित करून विकास मंडळांची कार्ये सुधारित केली आहेत. मा. राज्यपाल महोदयांच्या निदेशांनुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांची सुधारित कार्ये विचारात घेता त्यांच्याकडून सुचविण्यात येणाऱ्या कामांकरिता देण्यात येणारा एकूण रू. १०० कोटी इतका "विशेष निधी" सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून राज्य शासनाकडून बंद करण्यात आला. तद्नंतर, राज्य शासनाने केलेल्या विनंतीस अनुसरून मा. राज्यपाल महोदयांनी केवळ सन २०१४-१५ या एका आर्थिक वर्षाकरिता विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांना प्रत्येकी रू. १०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली होती. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांना "विशेष निधी" पुन्हा उपलब्ध करून देण्यासंदर्भात वारंवार प्राप्त होणाऱ्या विनंतीस

अनुसरून मा. राज्यपाल महोदय यांच्या विचारार्थ प्रस्ताव राज्य शासनाकडून सादर करण्यात आला होता.

## शासन निर्णय:

राज्य शासनाच्या प्रस्तावाबाबत मा. राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशांनुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांकरिता प्रत्येकी रू. ५० कोटी याप्रमाणे एकूण रू.१५० कोटी "विशेष निधी" सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## २. विशेष निधीचा विनियोग

२.१ विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांना सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध करून देण्यात येत असलेला प्रत्येकी रू. ५० कोटी "विशेष निधी" संबंधित विकास मंडळांनी राज्य शासनाच्या "मानव विकास कार्यक्रम (Human Development Programme)" अंतर्गत नियोजन विभागाच्या संदर्भाधीन क्र. १ व २ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या १२५ तालुके व "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रांमध्ये मानव विकास निर्देशांक (Human Development Index) वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजनां (District/ Tehsil Specific Schemes)" करिता "पूरक स्रोत (Supplementary Resource)" म्हणून वापरण्यात यावा. तथापि, कोणत्याही एका तालुका/ नगरपालिका (Tehsil/ Municipal Council) क्षेत्रामध्ये विशेष निधीच्या विनियोगाची कमाल मर्यादा रू. २.५ कोटी इतकी असेल.

२.२ विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांना सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध करून देण्यात येणारा प्रत्येकी रू. ५० कोटी "विशेष निधी" चा विनियोग करताना "मानव विकास कार्यक्रम (Human Development Programme)" अंतर्गत "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" राबविण्याकरिता नियोजन विभागाने संदर्भ क्र. १, २ व ३ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. तथापि, विशेष निधीमधून "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" अंतर्गत रस्ते, गटारे/सांडपाण्याची कामे, व्यायामशाळा, समाज मंदिरे यांचे बांधकाम, प्रशिक्षण कार्यक्रम/ कार्यशाळा ही कामे हाती घेण्यात येऊ नयेत. कामांची शिफारस करताना "महिला बचत गट (Women Self Help Groups)"व "शेतकरी उत्पादक

संस्था (Farmer Producers Organizations)" यांच्याशी संबंधित "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" यांना प्राधान्य देण्यात यावे.

## ३. कार्यपद्धती व अंमलबजावणी

३.१ विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांनी "मानव विकास कार्यक्रम (Human Development Programme)" अंतर्गत समाविष्ट क्षेत्रांतील मानव विकास निर्देशांक उंचावण्यासाठी "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" तयार करून संबंधित विभागीय आयुक्त (Divisional Commissioner) यांना शिफारस करावी आणि त्याची प्रत संबंधित जिल्हाधिकारी (District Collector) यांच्याकडे पाठवावी. तसेच, शिफारस करण्यात आलेली "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" प्रस्तावित करण्यापूर्वी आवश्यकता असल्यास आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांचेकडून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांनी आवश्यक अभिप्राय प्राप्त करून घ्यावेत.

३.२ विभागीय आयुक्त (Divisional Commissioner) यांच्या अध्यक्षतेखालील संनियंत्रण समिती (Monitoring Committee) कडे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांकडून शिफारशींसह प्राप्त होणाऱ्या "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" प्रस्तावासंदर्भात तात्काळ उचित छाननी करुन आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांच्याकडे शिफारशीसह सादर करावा. संबंधित विभागीय आयुक्त (Divisional Commissioner) यांच्याकडून शिफारस करण्यात आलेल्या "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजनांना (District/ Tehsil Specific Scheme)" आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांनी नियोजन विभागाच्या संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदींनुसार तत्वत: मान्यता (In Principal Approval) प्रदान करावी. अशा प्रकारे तत्वत: मान्यता (In Principal Approval) देताना कोणत्याही तालुका अथवा नगरपालिकेसाठी रु. २.५ कोटी इतक्या कमाल निधीच्या मर्यादेतच असाव्यात, त्यापेक्षा अधिकच्या शिफारशी आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांनी विचारात घेऊ नयेत. तसेच, खर्चासाठी उपलब्ध रू. ५० कोटीची

मर्यादा प्रत्येक विकास मंडळाकरिता राखली जाईल, याबाबत आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांनी दक्षता घ्यावी.

३.३ आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांनी प्रत्येक "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" करिता दिलेल्या तत्वत: मान्यते (In Principal Approval) अनुसार संदर्भ क्र. १ व २ येथील नियोजन विभागाच्या शासन निर्णयांन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार अशा "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजनां (District/ Tehsil Specific Scheme)" ना स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता (Administrative Approval) संबंधित जिल्हाधिकारी (District Collector) यांनी द्यावी.

३.४ जिल्हाधिकारी (District Collector) यांच्याकडून प्रशासकीय मान्यता (Administrative Approval) देण्यात येणाऱ्या कामांना द्यावयाच्या तांत्रिक मान्यते (Technical Sanction) संदर्भात "कार्यान्वयीन यंत्रणे (Implementing Agency)" कडून मानव विकास कार्यक्रमांतर्गत ज्या प्रकारे इतर "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" बाबतीत सध्या कार्यवाही करण्यात येते, त्यानुसार तांत्रिक मान्यता देण्यात येतील. कोणत्याही कार्यान्वयीन यंत्रणांकडे (Implementing Agency) जिल्हाधिकारी (District Collector) यांचेकडून निधी वितरण आदेश प्राप्त झाल्याशिवाय "कार्यारंभ आदेश (Work Order)" निर्गमित करण्यात येऊ नयेत.

३.५ जिल्हाधिकारी (District Collector) यांनी प्रशासकीय मान्यता (Administrative Approval) दिलेल्या "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" करिता आवश्यक निधी नियोजन विभागाकडून "अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप व संनियंत्रण प्रणाली (BEAMS)" द्वारे आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.

**४. संनियंत्रण व समन्वयन:**

४.१ जिल्हाधिकारी (District Collector) यांनी प्रशासकीय मान्यता (Administrative Approval) दिलेल्या "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" संदर्भात कामांच्या प्रगतीचा व्यक्तीश: आढावा घेऊन भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल (Physical & Financial Progress Report) दरमहा ५ तारखेपर्यंत

अध्यक्ष, विदर्भ विकास मंडळ, नागपूर/ मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद/ उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई तसेच, आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) व संबंधित विभागीय आयुक्त (Divisional Commissioner) यांचेकडे सादर करावा.

४.२ "विभागीय आयुक्त (Divisional Commissioner)" यांनी "जिल्हाधिकारी (District Collector)" यांच्यासोबत होणाऱ्या आढावा बैठकी (Review Meeting) मध्ये "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजनांच्या (District/ Tehsil Specific Scheme)" प्रगती संदर्भात नियमितपणे आढावा घ्यावा.

४.३ आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांनी जिल्हाधिकारी (District Collector) कडून "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" संदर्भात प्राप्त होणारे भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल (Physical & Financial Progress Report) संकलित करावेत व अपेक्षित निरीक्षणे नोंदवून एकत्रित अहवाल दरमहा दिनांक १० तारखेपूर्वी नियोजन विभागाकडे सादर करावा.

४.४ आयुक्त, मानव विकास (Commissioner, Human Development) यांनी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांकरिता उपलब्ध एकूण रू. १५० कोटी "विशेष निधी" मधून घेण्यात आलेल्या "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" संदर्भात महसूल विभाग व जिल्हानिहाय विविध योजना व कामे, विनियोग झालेला निधी तसेच, मानव विकास निर्देशांक (Human Development Index) मध्ये वाढ होण्यासंदर्भात फलनिष्पती बाबतचा एक सविस्तर अहवाल (Comprehensive Report) तयार करून दिनांक ३१ मे, २०२० पूर्वी नियोजन विभागाकडे सादर करावा.

५. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांना देण्यात आलेल्या एकूण रू. १५० कोटी "विशेष निधी" संदर्भातील धोरणात्मक बाबी उपस्थित झाल्यास त्याबाबत नियोजन विभागामार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. तथापि, "जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना (District/ Tehsil Specific Scheme)" राबविताना क्षेत्रीय/ अंमलबजावणी यंत्रणेकडून यामध्ये काही अनियमितता वा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास त्याअनुषंगाने संबंधित

कार्यान्वयीन यंत्रणां (Implementing Agency) विरूद्ध करावयाची पुढील कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागाने करावयाची आहे.

६. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला रु. १५० कोटी निधी "मागणी क्र. ओ-१०, ४५१५- इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च, ००, १०२- सामूहिक विकास, (००)(०२) वैधानिक विकास मंडळांचा क्षेत्रांतर्गत विकास कार्यक्रम (कार्यक्रम) (दत्तमत) (४५१५ ००३९) ५३-मोठी बांधकामे" या लेखाशीर्षाखाली उपलब्ध करून देण्यात येईल. आयुक्त, मानव विकास यांनी उपलब्ध करून देण्यात आलेला विशेष निधी व खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

७. नियोजन विभागाचा यापूर्वीचा शासन निर्णय क्रमांक विमंवि-२०१४/प्र.क्र.१२२/का.१४१६, दिनांक ०४ ऑगस्ट, २०१४ अधिक्रमित करण्यात येत आहे.

८. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७२३१५५३३८३४१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

DEBASHISH CHAKRABARTY

Digitally signed by DEBASHISH CHAKRABARTY
DN: c=IN, o=SHIVSHAHI PUNARVASAN PRAKALP LTD, postalCode=400051, st=Maharashtra, 2.5.4.20=4daed370a621e2af8f11cf24d5a7e91d2b66d4692e2b23b56c318ada6669ad76, serialNumber=95d383c8c075e901d5ea380253ffca99ff939d41e07ddb8ef6cf53b9de72e834, cn=DEBASHISH CHAKRABARTY
Date: 2019.07.23 16:02:44 +05'30'

**( देबाशिष चक्रवर्ती )**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती/ उप सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०. मा. अध्यक्ष, विदर्भ विकास मंडळ, नागपूर

११. मा. अध्यक्ष, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद
१२. मा. अध्यक्ष, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई
१३. मा. कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, मुंबई
१४. सर्व राज्यसभा / लोकसभा सदस्य,
१५. सर्व मा. विधानपरिषद सदस्य / मा. विधानसभा सदस्य
१६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१७. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
२१. आयुक्त (मानव विकास), मानव विकास आयुक्तालय, बाबा पेट्रोलपंपाजवळ, अदालत रोड, औरंगाबाद
२२. सर्व विभागीय आयुक्त,
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
२५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२७. सदस्य सचिव, विदर्भ विकास मंडळ, नागपूर
२८. सदस्य सचिव, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद
२९. सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई
३०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
३१. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
३२. उप संचालक, नगर पालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय,
३३. सर्व उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय
३४. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, महाराष्ट्र
३५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र
३६. सर्व सह/ उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३७. उप सचिव (व्यय-८ / अर्थसंकल्प १५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३८. उप सचिव (का. १४१८), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३९. सर्व कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
४०. निवड नस्ती, का. १४१६, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

## विशेष निधीतून जिल्हा / तालुका स्पेसिफिक योजनेचा प्रस्ताव

जिल्हा -

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| १) | योजनेचे नांव. | :- (जिल्हा / तालुका स्पेसिफिक योजनेतर्गत घ्यावयाच्या योजनेचे नांव नमूद करावे) |
| २) | योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणा-या कार्यान्वयीन यंत्रणेचे नांव. | :- |
| ३) | योजनेचे स्वरुप, व्याप्ती व उपयुक्तता. | :- ( येथे योजनेची सविस्तर पार्श्वभूमी / योजनेची व्याप्ती,/ योजनेच्या उपयुक्तता / योजना राबविल्याने होणारे फायदे इ. बाबत परिपूर्ण माहिती नमूद करावी ) |
| ४) | योजनेचे निकष. | :- (येथे या योजनेच्या अंमलबजावणीविषयीचे आणि तालुका / गांव / समूहगट / लाभार्थी निवडीचे सविस्तर निकष नमूद करावेत) |
| ५) | योजनेसाठी तालुकानिहाय / बाबनिहाय अपेक्षित खर्च. | :- (येथे तालुकानिहाय बाबनिहाय अपेक्षित खर्चाचा सविस्तर तपशिल नमूद करावा) |
| ६) | सदरील योजनेच्या अंमलबजावणीसाठी बीडीएसवर उपलब्ध तरतूद. | :- (येथे योजनेचा प्रस्ताव सादर करतेवेळी प्रत्यक्षात उपलब्ध असलेली तरतूद नमूद करावी) |
| ७) | मूल्यमापन करण्याबाबत हमी. | :- (येथे योजनेच्या अंमलबजावणीनंतर या योजनेचे यशदा, पुणे किंवा शासनाने मान्यता दिलेल्या इतर सक्षम संस्थेमार्फत मूल्यमापन करण्याबाबत हमी देण्यात यावी) |

सोबत- इतर अनुषंगिक तपशिल.

अपर आयुक्त तथा सदस्य सचिव,
....... विकास मंडळ,
.........